
ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 9 | June - 2016
Review Of Research

# उस्मानाबाद जिल्हयाची पार्श्वभूमी व सद्यस्थिती

माधव वसंतराव शिंदे



**सारांशः**

उस्मानाबाद जिल्हयाचा भौगोलिक , आर्थिक व कृषी विषयक अभ्यास केला असता असे दिसून येते की, मराठवाडयातील आठ जिल्हयापैकी एक उस्मानाबाद जिल्हा असून या जिल्हयाचा बराचसा भाग डोंगराळ पटयात येतो. हा जिल्हा प्रामुख्याने आवर्षन प्रवण जिल्हा म्हणून ओळखला जातो. मराठवाडयातील सर्वात कमी पाऊस या जिल्हयात होतो. जमीन मध्यम ते चांगल्या दर्जाची असून खरीप व रब्बी पिके मोठया प्रमाणावर घेतली जातात. तसेच ऊसासारखे नगदी पिक ही अलीकडील 10 वर्षात मोठया प्रमाणावर घेतले जाते.

1853 मध्ये उस्मानाबाद जिल्हा ब्रिटीश सरकारच्या स्वाधीन होता. 1860 मध्ये तो हैद्राबाद राज्याकडे देण्यात आला. त्यावेळी जिल्हयाचे मुख्यालय नळदुर्ग होते व 1904 पर्यंत नळदुर्ग हाच जिल्हा म्हणून ओळखला जात होता. त्यानंतर उस्मानाबाद हा नवीन जिल्हा म्हणून स्थापन झाला आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या लढयात उस्मानाबाद जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिकांचे मोठे योगदान राहिलेले आहे. हैद्राबाद मुक्ती संग्राम लढयाचे प्रणेते स्वामी रामानंद तिर्थ यांनी तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा (रवा) या गावी शाळेमध्ये जाऊन तरुणांना स्वातंत्र्यलढयाचे शिक्षण दिले होते. 1956 मध्ये हा जिल्हा मुंबई या व्दिभाषिक राज्यात समाविष्ट करण्यात आला. 1981 पर्यंत लातूर हा उस्मानाबाद जिल्हयाचा तालुका होता परंतु ऑगस्ट 1982 मध्ये या जिल्हयाचे विभाजन होऊन उस्मानाबाद व लातूर हे स्वतंत्र जिल्हे निर्माण झाले. पूर्वी जिल्हयात 6 तालुके होते. 1999 मध्ये उमरगा व भूम तालुक्याचे विभाजन करुन लोहारा व वाशी या दोन नवीन तालुक्याची निर्मिती करण्यात आली. आज उस्मानाबाद जिल्हयात एकूण 8 तालुके आहेत.

**मुख्य शब्द :** भौगोलिक परिस्थिती, प्राकृतिक रचना, बँकेचा इतिहास , उद्देश व कार्ये

## प्रस्तावना

### उस्मानाबाद जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती :-

महराष्ट्र राज्याच्या नकाशामध्ये उस्मानाबाद हा जिल्हा आग्नेय बाजूस असून मराठवाडा विभागात पुर्वेकडे वसलेला आहे. भौगोलिक क्षेत्रफळाच्या बाबतीत उस्मानाबाद जिल्हयाचा महाराष्ट्र राज्यात 24 वा क्रमांक लागतो. उस्मानाबाद जिल्हयाची भौगालिक परिस्थिती खालील प्रमाणे विशद करता येईल.

उस्मानाबाद जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ 7512.4 चौ.कि.मी. आहे. जिल्हयाच्या एकुण क्षेत्रफळा पैकी 241.4 चौ.कि.मी. क्षेत्र (3.21 %) शहरी असून उर्वरित 7271.0 चौ.कि.मी. क्षेत्र (96.79%) ग्रामीण आहे.

उस्मानाबाद जिल्हयाचा भौगोलिक क्षेत्रफळाचा विस्तार 17.35˙ ते 18.40˙ उत्तर अक्षांश व 75.16˙ ते 76.40˙ पुर्व रेखांश आहे. जिल्हयाच्या दक्षिण - पश्चिमेस सोलापूर, उत्तर - पश्चिमेच्या बाजूला अहमदनगर, उत्तरेस बीड, ईशान्य व पुर्व दिशेला लातूर व दक्षिणेला कर्नाटक राज्यातील अनुक्रमे बीदर व गुलबर्गा हे जिल्हे आहेत. उस्मानाबाद जिल्हयाच्या सिमा लक्षात घेता, उस्मानाबाद जिल्हयाची सिमा चार जिल्हयाच्या सिमेला आणि एका राज्याच्या सिमेला स्पर्श करते. जिल्हयाच्या दक्षिण - पश्चिमेस तुळजापूर तालुक्याला स्पर्श करुन सोलापूर जिल्हा येतो. उत्तर - पश्चिमेस भूम व परंडा या तालुक्याला स्पर्श करुन अहमदनगर जिल्हा येतो. तर उत्तरेला कळंब तालुक्यालगत बीड जिल्हा

येतो. तर पुर्व - दक्षिणेला उस्मानाबाद व उमरगा तालुक्याला स्पर्श करुन लातूर जिल्हा येतो. उमरगा तालुक्याला दक्षिणेला स्पर्श करुन कर्नाटक राज्यातील बिदर व गुलबर्गा जिल्हयाच्या सिमा येतात.

### उस्मानाबाद जिल्हयाची प्राकृतिक रचना :-

उस्मानाबाद जिल्हाचा बहुतांश भाग बालाघाट डोंगर रांगाचा आहे. बालाघाट या डोंगर रांगा मध्ये येरमाळा, येडशी, उस्मानाबाद, तुळजापूर, नळदुर्ग, भूम इत्यादी भागातील डोंगर रांगाचा समावेश होतो. उस्मानाबाद जिल्हयात राणा टेकडी व देवबेट या टेकडया आहेत. प्राकृतिक रचनेनुसार जिल्हयाचे प्रामुख्याने तीन विभाग पडतात. उस्मानाबाद जिल्हा हा समुद्र सपाटी पासून 600 मीटर उंचीवर आहे. उस्मानाबाद जिल्हयातील भूम हे शहर समुद्रसपाटी पासून 760 मीटर उंचीवर असल्यामुळे ते उस्मानाबाद जिल्हयाचे सर्वात उंच ठिकाण आहे. तर परंडा हे शहर समुद्र सपाटी पासून 530 मीटर उंचीवर असल्यामुळे ते उस्मानाबाद जिल्हयाचे सर्वात कमी उंचीचे ठिकाण आहे.

### जमीनीचा प्रकार :-

उस्मानाबाद जिल्हयातील जमीनीची विभागणी दोन विभागात केली आहे. पहिल्या विभागात काळया व सुपीक मातीचा थर असलेली काळीभोर सुपीक जमीन तसेच हलक्या प्रतीची जमीन आढळते. जमीनीच्या या वैशिष्टयामुळे या भागात खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात पिके घेतली जातात. यामध्ये कळंब व उस्मानाबाद या दोन तहसीलचा समावेश होतो. या तहसीलच्या पुर्व भागात खरीप व पश्चिमेकडील भागात रब्बी पिके घेतली जातात. जमीनीच्या विभागणीच्या दुसऱ्या विभागात प्रामुख्याने लालसर, राखट , पांढरट सुपीक जमीनीचा समावेश आहे. येथे मुख्यत: रब्बी पिके घेतली जातात.

### उस्मानाबाद जिल्हयातील नदया :-

तेरणा नदी जिल्हयाच्या पश्चिमेकडून पुर्वेकडे उस्मानाबाद व उमरगा तालुक्यातून वाहत जाऊन पुर्वेकडील सिमेवर मांजरा नदीस मिळते. परंडा तालुक्याच्या पश्चिम सिमेवरुन सिना नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहत जाते. बोरी नदी तुळजापूर तालुक्यापासून वाहत पुढे ती सोलापूर जिल्हयात प्रवेश करते व सिना नदीस जाऊन मिळते या नदया व्यतिरिक्त उमरगा तालुक्यात बेनीतुरा , भूम तालुक्यात बाणगंगा आदी अन्य नदया व नाले आहेत पण पावसाळा सोडून अन्यकाळात वर्षभर त्या जवळ जवळ कोरडयाच असतात. कारण, पावसाचे पाणी उंच डोंगरावरुन वाहत येते व दुसऱ्या जिल्हयात वाहत जाते. जलसिंचन प्रकल्प , पाझरतलाव या व्यतिरिक्त जिल्हयात मोठे तलाव किंवा सरोवर नाहीत.

### उस्मानाबाद जिल्हयातील पर्जन्यमान :-

दक्षिण पठारावरील इतर जिल्हयाप्रमाणे उस्मानाबाद जिल्हयात देखील दक्षिण - पुर्व मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. साधारणपणे जूनच्या मध्यापासून पावसाळा चालू होतो. वर्ष 2009-10 मधील जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान 739.93 मि.मि. होते. त्यापैकी उस्मानाबाद व तुळजापूर या पश्चिमेकडील तहसील मध्ये अनुक्रमे 751.7 मि.मि व 937.4 मि.मि. पाऊस झाला. परंडा, भूम व वाशी या पश्चिम घाटाच्या पर्जन्यछायेतील तहसील मध्ये या वर्षात अनुक्रमे 615.5, 905.9 व 715.6 मि.मि. पाऊस झाला. तर कळंब तालुक्यात 715.6 व उमरगा तालुक्यात 799 तसेच लोहारा तालुक्यात 799 मि.मि. पाऊस झाला. संदर्भ वर्षात सर्वात जास्त 937.4 मि.मि. पाऊस तुळजापूर येथे व सर्वात कमी पाऊस 615.5 मि.मि. पाऊस परंडा येथे नोंदला गेला.

### उस्मानाबाद जिल्हयातील खनिजे व वनसंपत्ती :-

बेसॉल्ट दगडा शिवाय दुसरे खनिज उस्मानाबाद जिल्हयामध्ये दिसून येत नाही. एकंदर उस्मानाबाद जिल्हयात महत्वाची खनिजे नाहीत. बांधकाम उपयोगी पडणारे दगड, वाळू, माती इत्यादी किरकोळ खनिजापासून थोडे फार उत्पन्न रॉयल्टी म्हणून शासनास मिळते.

उस्मानाबाद जिल्हा जंगलासाठी प्रसिध्द नाही. उस्मानाबाद जिल्हयामध्ये वनक्षेत्र 50.74 चौ.किं.मी. असून हे प्रमाण उस्मानाबाद जिल्हयाच्या एकुण क्षेत्रफळाच्या केवळ 0.67% इतके आहे. घेवडा, खैर, बोर, कडुलिंब, दामण, मोवा, हिदर, करवंद इत्यादी वनस्पतीच्या जाती पहावयास मिळतात. एकदंर उस्मानाबाद जिल्हयातून वन खात्यास अतिशय अल्प प्रमाणात उत्पन्न मिळत आहे.

### उस्मानाबाद जिल्हयातील पिक रचना :-

जिल्हयात खरीप व रब्बी पिके घेतली जातात. दोन्ही हंगामात घेतल्या जाणाऱ्या या पिकामध्ये सर्वात जास्त क्षेत्र एकदल धान्याचे असून या नंतर तेलवर्गीय पिके व त्या खालोखाल व्दिदल धान्य असा क्षेत्रानुसार पिकाचा क्रम लागतो. सन 2008-09 मध्ये खरीप ज्वारीचे क्षेत्र 85917 हेक्टर म्हणजे निव्वळ कसलेल्या क्षेत्राच्या 13.42% होते. तूर हे महत्वाचे खरीपातील कडधान्य असून या पिका खालील क्षेत्र 220200 हेक्टर आहे. एकुण कडधान्याखालील क्षेत्राच्या 53.11% क्षेत्र या पिकाखाली आहे. रब्बी पिकामध्ये ज्वारी , गहू, हरभरा व करडई ही महत्वाची पिके असून रब्बी ज्वारीचे सन 2008-09 मधील जिल्हयातील क्षेत्र 251398 हेक्टर म्हणजेच निव्वळ कसलेल्या क्षेत्राच्या 44.24% होते.

तेलबियांच्या पिकामध्ये मुख्यत्वे सुर्यफुल, करडई , कारळी व जवस ही पिके घेतली जातात. करडई हे पिक रब्बीमध्ये कोरडवाहू जमीनीमध्ये घेतले जाते. मात्र भुईमुगाचे पिक हे खरीप व उन्हाळी या दोन्ही हंगामात घेण्यात येते आणि अलीकडील काही वर्षापासून सुर्यफुल या नवीन गळीताच्या पिकाचे क्षेत्र जिल्हयात वाढत असून ते पिक सर्व हंगामात घेता येते. जिल्हयात 2008-09 या वर्षात तेलबियांचे गळीतांच्या धान्याचे एकुण क्षेत्र 163604 हेक्टर होते. या पिकाखालील क्षेत्राची टक्केवारी निव्वळ कसलेल्या क्षेत्राच्या सुमारे 36.99% होती. करडई पिकाखालील क्षेत्र 32604 हेक्टर होते. व्यापारी पिकामध्ये ऊस व कापूस ही महत्वाची पिके आहेत. गेल्या काही वर्षात उपलब्ध असलेल्या ओलीताच्या सोयीमुळे ऊसाखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. सन 2008-09 या वर्षा मध्ये ऊसाखालील क्षेत्र 24600 हेक्टर होते.

### उस्मानाबाद जिल्हयातील उद्योगधंदे :-

उस्मानाबाद जिल्हयामध्ये लघुउद्योग व मोठे उद्योग असे दोन विभाग पडतात. उस्मानाबाद जिल्हयात 17 मोठे व मध्यम उद्योगधंदे असून 1709 लघु उद्योग आहेत.

- **लघु उद्योग :-**

उस्मानाबाद जिल्हयामध्ये हातमाग , घोगंडया विणणे, मातीचे भांडी तयार करणे इत्यादी लघु उद्योग उस्मानाबाद , तुळजापूर , परंडा , भूम या तालुक्यातील ग्रामीण भागात चालतात. तसेच गुऱ्हाळे व तेल घाणे हा लघु उद्योग जिल्हयाच्या सर्वच भागात चालतो. उस्मानाबाद जिल्हा हा दुध उत्पादनात अग्रेसर आहे, जिल्हयात अनेक ठिकाणी दुधापासून खवा, पेढा बनवून दूरवर पाठवला जातो. वाशी तालुक्यात सरमकुंडी फाटा, भूम तालुक्यात पाथरुड, उस्मानाबाद तालुक्यात येरमाळा या ठिकाणी तसेच परिसरात खवा भटटया आहेत. उस्मानाबाद शहर हे गुलाब - जामुनसाठी प्रसिध्द आहे. उस्मानाबाद व वाशी तालुक्यात तेरखेडा व तडवळे (क) येथील फटाका उद्योग शोभेच्या दारुकामासाठी प्रसिध्द आहेत.

- **मोठे उद्योग :-**

उस्मानाबाद शहराच्या उत्तरेला (येडशी रोड) म.औ.वि.मं. ने मोठी औद्योगिक वसाहत निर्माण केलेली असून येथे अनेक छोटे-मोठे उद्योग धंदे चालतात. उदा. स्टील फॅब्रीकेशन, ॲल्युमिनियमची भांडी, सिमेंट पाईप, पॅकिंग पेपर, प्लॅस्टीक चप्पल बनविणे, इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मर दुरुस्त करणे इत्यादी त्यामुळे जिल्हयात रोजगार निर्मिती झाली असून आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. तसेच उस्मानाबाद जिल्हयामध्ये 7 सहकारी साखर कारखाने व 5 खाजगी साखर कारखाने व 2 सहकारी सुत गिरणी, 1 सहकारी जिल्हा दूध उत्पादक संघ, एस.के.ट्रान्सफार्मर, सी.डी.महिला पेपर प्रोडक्टस, अजमेरा ट्रान्सफार्मर, अनिकेम इंडस्ट्रीज, नामानंद फुड प्रोडक्टस इत्यादी उद्योग आहेत.

### व्यापार :-

उस्मानाबाद जिल्हयात तालुक्याच्या किंवा मोठया गावाच्या ठिकाणी एकूण 9 कृषी उत्पन्न बाजार समिती आहेत. शेतीमधून उत्पादित होणारा माल शेतकरी या ठिकाणी विक्रीसाठी आणतात. वर्ष 2009-10 मध्ये सर्व बाजार समित्यात एकूण 21419 मे.टन धान्य विक्रीसाठी आले व त्याची किंमत रु.659300 हजार होती.

उस्मानाबाद जिल्हयातून ज्वारी, साखर व खवा या वस्तूचा व्यापार मोठया प्रमाणात चालतो. उस्मानाबाद शहर ज्वारी व कडधान्य यांच्या व्यापारासाठी प्रसिध्द आहे. याशिवाय सूर्यफूल, भुईमूग, शेंगदाणा तेल, बोरे, फटाके, चामडयांच्या वस्तू इत्यादी माल जिल्याबाहेर पाठवला जातो. जिल्हयातील या उत्पादनाचा व्यापार मोठया प्रमाणात चालतो.

तांदूळ, डाळी, खाद्यतेल, यंत्रे, औषधे, कापड, सायकल इत्यादी माल दुसऱ्या जिल्हयातून येतो. जिल्हयातील व्यापार प्रामुख्याने रस्त्यांव्दारे चालतो. उमरगा तालुक्यात कसगी व उस्मानाबाद तालुक्यातील येडशी येथे गुरांचा बाजार भरतो. येडशी येथे कातडयांचा व्यापार मोठया प्रमाणात चालतो.

### दळणवळणाची साधने :-

जिल्हयात उस्मानाबाद - लातूर ब्रॉड गेज रेल्वे हा एक लोहमार्ग असून त्याची जिल्हयातील लांबी 30 कि.मी. आहे. या रेल्वे मार्गावरुन लातूर - उस्मानाबाद- मुंबई, हैद्राबाद - पुणे, पंढरपुर - निजामाबाद रेल्वे धावते.

सार्वजनिक बांधकाम खाते व कार्यकारी अभियंता आणि जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्या कडून रस्त्याची देखभाल केली जाते. सन 2008-09 अखेर या दोन्ही विभागातील रस्त्यांची लांबी (नगरपालीका रस्ते धरुन) 5408 कि.मी. होती. या मार्गापैकी सिमेंट रस्ते व डांबरी मार्गाची 3533 कि.मी., खडीचे पक्के रस्ते 1477 कि.मी. इतर माल वापरुन तयार केलेले 338.21 कि.मी. रस्ते आहेत. उस्मानाबाद जिल्हयातून राष्ट्रीय हायवे क्र.9 व राष्ट्रीय हायवे क्र.211 गेलेला आहे.

दिनांक 31 मार्च 2010 अखेर जिल्हयात एकूण 99422 नोंदणीकृत वाहने होती. त्यापैकी 65815 मोटार सायकली, मोपेड स्कुटर, 5995 ट्रॅक्टर्स व 12678 मोटारी , जिप्स व स्टेशन वॅगन होत्या , जडवाहतुक करणारे वाहन 4152 , तीनचाकी वाहन 6198 व इतर वाहतुक 4212 वाहन आहेत. तसेच 342 महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहनच्या प्रवासी बसगाडया आहेत.

### लोकसंख्या :-

देशाच्या आर्थिक विकासात देशातील उपल्बध नैसर्गिक साधन सामुग्रीला जेवढे महत्व असते. तेवढेच महत्व त्या देशातील कार्यकारी किंवा कर्त्या लोकसंख्येला असते. परंतू देशातील कर्ती लोकसंख्या ही त्या देशाच्या एकूण लोकसंख्येवर अवलंबून असते. लोकसंख्या ज्या पटीने वाढत जाते तेवढयाच पटीने त्या देशातील समस्या त्या प्रमाणात वाढत जातात. उदा. राहण्याची जागा, आरोग्य सुविद्या, पाणी पुरवठा , सांडपाण्याची व्यवस्था, अन्न धान्य, रोजगार इत्यादी.

उस्मानाबाद जिल्हयाच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयाची शहरी भागात राहणारी लोकसंख्या आणि ग्रामीण भागात राहणारी लोकसंख्या त्यामध्ये पुरुष व स्त्रीयांचे प्रमाण इत्यादी माहिती खालील सारणी क्रमांक 3.1 मध्ये दर्शवलेली आहे.

**सारणी क्र. 3.1**
**उस्मानाबाद जिल्हयातील लोकसंख्या (वर्ष 2001 जनगणने नुसार)**

| अ. क्र. | भाग | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | लोकसंख्या | | | दर चौ.कि.मी.मध्ये लोकसंख्या घनता |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण | |
| 1 | ग्रामीण | 7271.0 (96.78%) | 641825 (84.12%) | 597184 (84.19%) | 1239009 (84.15%) | 149 |
| 2 | नागरी | 241.4 (3.22%) | 121122 (15.88%) | 112125 (15.81%) | 233247 (15.85%) | 803 |
| 3 | एकूण | 7512.4 (100%) | 762947 (100%) | 709309 (100%) | 1472256 (100%) | 198 |

स्त्रोत :- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा उस्मानाबाद 2010 (अर्थ व सांख्यिकी संचनालय महाराष्ट्र शासन मुंबई )

सारणी क्र. 3.1 वरुन असे दिसून येते की, उस्मानाबाद जिल्हयाचे 2001 च्या जनगणनेनुसार एकूण क्षेत्रफळ 7512.4 चौ.कि.मी. आहे, त्यापैकी ग्रामीण भागाचे क्षेत्रफळ 7271.0 चौ.कि.मी. (96.78%) आहे तर शहरी / नागरी भागाचे क्षेत्रफळ 241.4 चौ.कि.मी. (3.22%) आहे. उस्मानाबाद जिल्हयाची एकूण लोकसंख्या 1472256 असून त्यापैकी ग्रामीण भागाची लोकसंख्या 1239009 तर नागरी भागातील लोकसंख्या 233247 आहे. उस्मानाबाद जिल्हयातील स्त्रीयांची एकूण लोकसंख्या 709309 असून त्यापैकी ग्रामीण भागातील स्त्रीयांचे प्रमाण 84.19% आहे तर नागरी भागातील स्त्रीयांचे प्रमाण 15.81% आहे. उस्मानाबाद जिल्हयातील पुरुषांची एकूण लोकसंख्या 762947 असून त्यापैकी ग्रामणी भागातील पुरुषांचे प्रमाण 84.12% तर नागरी भागातील पुरुषाचे प्रमाण 15.88% आहे. जिल्हयाची दर चौ.कि.मी.मधील एकूण लोकसंख्या घनता 198 आहे. ग्रामीण लोकसंख्या घनता 149 व नागरी लोकसंख्या घनता 803 आहे. या वरुन असे दिसून येते की, महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा उस्मानाबाद जिल्हयात लोकसंख्या वाढीचा दर कमी आहे. तसेच जिल्हयाचे एकूण लोकसंख्येशी तालुका निहाय लोकसंख्या विभागणीची टक्केवारी पुढील प्रमाणे दर्शवली आहे. उस्मानाबाद 24.17 , कळंब 12.66, उमरगा 16.23, तुळजापूर 16.83, परंडा 8.41, भूम 7.86 , वाशी 6.42 व लोहारा 7.42 टक्के आहे.

### स्त्री - पुरुष प्रमाण :-

महाराष्ट्र राज्यात दर हजार पुरुषामागे 922 स्त्रीया हे प्रमाण सन 2001 च्या जनगणनेप्रमाणे आहे. तर उस्मानाबाद जिल्हयात हेच प्रमाण दर हजार पुरुषामागे 932 स्त्रीया आहे. जिल्हयातील ग्रामीण भागात तेच प्रमाण 938 स्त्रीया व नागरी भागात 926 स्त्रीया या प्रमाणे आहे.

### साक्षरता :-

2001 च्या जनगणनेप्रमाणे उस्मानाबाद जिल्हयातील साक्षरतेची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या 69% आहे. महाराष्ट्र राज्याची हीच टक्केवारी 76.90% आहे. ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण 67% असून शहरी भागात हेच प्रमाण 71% आहे. जिल्हयात एकूण पुरुषाचे साक्षरतेचे प्रमाण 80.42% तर स्त्रीयांचे 57.58% आहे. नगर पालिका निहाय साक्षरतेचे विचार केला असता सर्वात जास्त म्हणजे 84.50%

साक्षरतेची टक्केवारी उस्मानाबाद नगर पालिकामध्ये आहे, तर सर्वात कमी म्हणजे 62.39% साक्षरतेची टक्केवारी मुरुम नगर पालिकेची आहे.

### शैक्षणिक सुविद्या (प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन):-

उस्मानाबाद जिल्हयात सन 2009-10 वर्षाअखेर प्राथमिक शाळांची संख्या 1201 होती. माध्यमिक शाळांची संख्या 328 व उच्च माध्यमिक शाळांची संख्या 86 होती. महाविद्यालयांची संख्या 57 होती. सन 2009-10 या वर्षात प्राथमिक शाळांचे प्रमाण दर एक लाख लोकसंख्येमागे 80, माध्यमिक शाळांचे प्रमाण दर एक लाख लोकसंख्येमागे 22 व उच्च माध्यमिक शाळांचे प्रमाण दर एक लाख लोकसंख्येमागे 6 आहे. तर महाविद्यालयाचे प्रमाण दर एक लाख लोकसंख्येमागे 04 आहे.

सन 2009-10 या वर्षात एकूण 351358 विद्यार्थ्यांपैकी 49.84% विद्यार्थी प्राथमिक शाळेत, 28.93% विद्यार्थी माध्यमिक शाळेत, 13.99% विद्यार्थी उच्च माध्यमिक शाळेत व महाविद्यालयीन संस्थेत 7.24% विद्यार्थी शिक्षण घेत होते. एकूण विद्यार्थ्यांपैकी मुलींची टक्केवारी 45.79% होती. जिल्हयातील एकूण लोकसंख्येमध्ये स्त्रीयांचे प्रमाण 48.24% आहे. हे लक्षात घेता एकूण विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे असे दिसून येते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी - शिक्षक प्रमाण अभ्यासले असता प्रत्येक शिक्षकामागे अनुक्रमे 27 विद्यार्थी हे प्रमाण आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार दर हजार लोकसंख्येमागे जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचे प्रमाण 225 विद्यार्थी होते. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा तौलनिक अभ्यास करता जिल्हयातील प्राथमिक शाळेतील दर 100 विद्यार्थ्यांमागे माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील 64 विद्यार्थी येतात.

सन 2009-10 या वर्षात सामान्य शिक्षणाच्या महाविद्यालयाची संख्या 12 होती. उस्मानाबाद येथे 3 , तुळजापूर येथे 1 खाजगी क्षेत्रातील अभियांत्रिकी महाविद्यालय असून उस्मानाबाद येथे एक शासकीय तंत्रनिकेतन व 2 खाजगी तंत्रनिकेतन आहेत. जिल्हयामध्ये 8 औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत.

### उस्मानाबाद जिल्हयाचे एकूण स्थुल व निव्वळ उत्पन्न :-

उस्मानाबाद जिल्याचे वर्ष 2009-10 मध्ये चालू किंमती नुसार एकूण स्थुल उत्पन्न रु.5323.64 कोटी होते. जिल्हयाचे एकूण निव्वळ उत्पन्न रु.4601.07 कोटी होते. महाराष्ट्र राज्याच्या उत्पन्नात जिल्हयाचा हिस्सा 0.77% दिसून येतो. तसेच उस्मानाबाद जिल्हयाचे स्थिर किंमतीनुसार वर्ष 2009-10 मध्ये एकूण स्थुल उत्पन्न रु.3366.10 कोटी होते. जिल्हयाचे एकूण निव्वळ उत्पन्न रु.2888.09 कोटी होते. राज्याच्य उत्पन्ना जिल्हयाचा हिस्सा 0.76% दिसून येतो.

उस्मानाबाद जिल्हयाचे वर्ष 2009-10 मध्ये चालू किंमतीनुसार एकूण दरडोई स्थुल उत्पन्न रु.32897 आहे. तर राज्याचे उत्पन्न रु.63609 असल्याचे दिसून येते.

### उस्मानाबाद जिल्हयातील बचत गट :-

उस्मानाबाद जिल्हयात वर्ष 2009-10 मध्ये एकुण बचत गटांची संख्या 5831 आहे. त्या पैकी महिला बचत गटाची संख्या 4168 आहे. एकूण बचत गटापैकी कार्यरत असलेले बचत गट 5474 आहेत. प्रथम प्रतवारी झालेले एकूण बचत गट 3269, व्दितीय प्रतवारी झालेले एकूण बचत गट 1211 व व्यवसाय करीत असलेले बचतगट एकूण 994 आहेत.

### उस्मानाबाद जिल्हयातील वर्गीकृत बँका व सहकारी संस्था :-

उस्मानाबाद जिल्हयात वर्ष 2009-10 मध्ये एकूण 47 वर्गीकृत बँका असून वर्गीकृत बँकांची 182 शाखा कार्यालये आहेत. वर्गीकृत बँकांच्या एकूण ठेवी रु.174670 लाख आहेत, वर्गीकृत बँकांनी केलेले शेती कर्ज वाटप रु.28356 लाख व बिगर शेती कर्ज वाटप रु.9562 लाख आहे.[16] तसेच जिल्हयात वर्ष 2009-10 मध्ये सहकारी संस्थांची संख्या 4252 होती. सहकारी संस्थांच्या सभासद संख्या 809 (हजार) होती. वर्ष 2009-10 मध्ये कृषी पतसंस्था 472 (11.10%) आहेत, 2058 (48.40%) उत्पादक सहकारी संस्था आहेत, 1287 (30.27%) सामाजिक सेवा सहकारी संस्था आहेत, 39 (0.92%) पणन संस्था आहेत व 396 (9.31%) बिगर कृषी पत संस्था आहेत. जिल्हयातील सहकारी संस्थांच्या एकूण ठेवी रु.96705.26 लाख आहेत, खेळते भांडवल रु.263956.04 लाख आहे, संस्थांचे येणेबाकी कर्ज रु.8560.45 लाख आहे. जिल्याती नफयातील सहकारी संस्थांची संख्या 1259 आहे व तोटयातील सहकारी संस्थांची संख्या 2599 तसेच ना-नफा, ना-तोटा झालेल्या संस्था 394 आहेत.

### उस्मानाबाद जिल्हयातील विविध प्रकारच्या सहकारी संस्था :-

उस्मानाबाद जिल्हयात विविध प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. या सर्व सहकारी संस्थांचे पालकत्व स्विकारलेली उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली. ही असून 31 मार्च 2010 अखेर जिल्हयातील विविध सहकारी संस्थांची संख्या खालील प्रमाणे आहे.

सारणी क्र.3.2 वरुन असे दिसून येते की उस्मानाबाद जिल्हयात 31मार्च 2010 अखेर 4252 एकूण सहकारी संस्था असून त्यात 1 जि.म.सह.बँक आहे. दुग्ध व्यवसाय संस्थांची संख्या सर्वात जास्त म्हणजे 1580 इतकी आहे. तर प्राथमिक विकास कार्यकारी सेवा सोसायटी 469 आहेत. बिगर कृषी सहकारी पतसंस्था 396 असून त्यापैकी नागरी सहकारी बँका 12, नागरी पतसंस्था 113, कर्मचारी सहकारी पतसंस्था 154, इतर बिगर कृषी सहकारी पतसंस्था 117 आहेत. सामाजिक सेवा सहकारी संस्था 1288 असून त्यापैकी ग्राहक भांडार 34, गृहनिर्माण संस्था 339, कामगार कंत्राटदार संस्था 412, इतर सहकारी संस्था 503 आहेत. पणन संस्था 39 व धान्य बँक 1 असून उर्वरित बाकी सर्व सहकारी संस्था या उत्पादक सहकारी संस्था आहेत त्यांची एकूण बेरीज 478 आहे. शेती आणि शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांच्या संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढ होणेही आवश्यक आहे.

**सारणी क्र. 3.2**

**उस्मानाबाद जिल्हयातील सहकारी संस्था :** (31 मार्च 2010 अखेर)

| **अ.क्र.** | **सहकारी संस्था** | **संख्या** | **अ.क्र.** | **सहकारी संस्था** | **संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | 01 | 12 | औद्योगिक वसाहती संस्था | 1 |
| 2 | प्राथमिक वि.का.सेवा सो. | 469 | 13 | इतर औद्योगिक संस्था | 206 |
| 3 | धान्य बँका | 1 | 14 | दुग्ध व्यवसाय संस्था | 1580 |
| 4 | नागरी सह. बँका | 12 | 15 | मत्सव्यवसाय संस्था | 130 |
| 5 | नागरी पतसंस्था | 113 | 16 | सहकारी सूत गिरण्या | 4 |
| 6 | कर्मचारी सह. पतसंस्था | 154 | 17 | उपसा जलसिंचन संस्था | 28 |
| 7 | इतर बिगर- कृषी सह. पतसंस्था | 117 | 18 | इतर उत्पादक संस्था | 20 |
| 8 | पणन संस्था | 39 | 19 | ग्राहक भांडारे | 34 |
| 9 | साखर कारखाने | 9 | 20 | गृहनिर्माण संस्था | 339 |
| 10 | इतर शेती प्रक्रिया संस्था | 12 | 21 | कामगार कंत्राटदार संस्था | 412 |
| 11 | विणकर संस्था | 68 | 22 | इतर सहकारी संस्था | 503 |
| **एकूण** | | | | | **4252** |
| संदर्भ - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद वर्ष 2009-10 | | | | | |

## निष्कर्ष—

### उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा इतिहास :-

सहकारी चळवळीच्या सुरुवातीला 1904 मध्ये पहिला सहकारी कायदा पास झाला मात्र या कायदयामध्ये फक्त प्राथमिक स्तरावरील सहकारी पतसंस्थांचीच स्थापना करण्याची तरतूद होती. परंतु या संस्थांना मोठया प्रमाणात वित्त साहयाची आणि योग्य मार्गदर्शनाची गरज होती. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी या स्तरावर त्यांच्या संघ संस्था असाव्यात याची जाणीव सरकारला व सहकारी कार्यकर्त्यांना झाली म्हणूनच 1912 मध्ये सुधारित सहकारी कायदा पास करण्यात आला व त्याव्दारे अशा संघ संस्थांना मान्यता देण्यात आली. नंतर जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका संघटीत करण्यात आल्या. थोडक्यात प्राथमिक सहकारी संस्था आधिक कार्यक्षम होण्यासाठी त्यांना भांडवल पुरविणाऱ्या मध्यवर्ती बँका निर्माण झाल्या आहेत. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्हयात संबंधीत जिल्हयाच्या नावाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन झालेल्या आहेत. अशा प्रकारची पहिली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक वर्धा जिल्हयात 1912 मध्ये स्थापन झाली होती. 1936 पासून मॅकलेगन संमितीच्या शिफारशीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यास गती मिळाली.

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना नोंदणी क्रमांक एस.एम./ बी.एन.के./ सी-26/8485 दिनांक 17 ऑगस्ट 1984 साली झाली आहे. आज या बँकेने 2013-2014 मध्ये 30 वर्ष पुर्ण केलेली आहेत. उस्मानाबाद जिल्हा हे तिचे कार्यक्षेत्र असून ती जिल्हयातील सर्व प्रकारच्या प्राथमिक सहकारी संस्थांची संघसंस्था आहे. या संस्थांना आर्थिक मदत करते, मार्गदर्शन करते तसेच त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मदत करते.

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्हयातील सहकारी संस्थांची शिखर बँक आहे. सहकारी संस्थांमार्फत जिल्हातील सर्व स्तरातील व सर्व घटकातील सभासद बांधवाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने बँक प्रयत्नशील आहे. जिल्हयातील कृषी सहकारी संस्थेच्या सभासदांना त्यांच्या शेतीविषयक गरजा लक्षात घेवून पीक कर्ज, सिंचन व्यवस्थेसाठी इलेक्ट्रीक मोटर, पाईपलाईन, शेती विकास व पूरक व्यवसायासाठी कृषी यांत्रीकीकरण, दुग्ध व्यवसाय, शेळी मेंढी पालन, स्वयंसहाय्यता बचत गट इत्यादी साठी कर्ज पुरवठा करीत आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील सरासरी कमी पर्जन्यमान, तीन वर्षातून एकदा येणारे आवर्षन इ. बाबी लक्षात घेवून उपलब्ध पाण्याचे सुनियोजन व्हावे हा दृष्टीकोन समोर ठेवून विविध शेतकरी सहकारी साखर कारखान्या मार्फत कार्यक्षेत्रातील संस्था सभासदाचे क्षेत्रात ठिबक सिंचन संच बसविण्यात येत आहेत. उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने व्हावा व सुनियोजन व्हावे यासाठी ठिबक सिंचन योजना संपूर्ण जिल्हयांत राबविण्याचा बँकेचा मानस आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील शेतकरी , शेतमजूर व समान आर्थिक गरज असणारे लोक एकत्र येवून आपल्या गरजा भागविण्यासाठी स्वयं-सहाय्यता बचत गट स्थापन करुन कार्यरत आहेत. अशा गटातील सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी बँकेकडे कर्ज मागणी केल्यास गटाच्या कामकाजाचे मुल्यांकन करुन कर्ज वितरण करण्याचे धोरण बँकेने अवलंबिले आहे.

जिल्हयातील शेतकरी सभासदांच्या गरजा वेळेवर व पुरेशा प्रमाणात भागविण्यात बँकेचा सिहांचा वाटा आहे. तसेच बँकेने बिगर शेती कर्ज पुरवठा क्षेत्रातही सहकारी साखर कारखाने, लघुउद्योजक, पगारदार नोकरांच्या संस्था याशिवाय लहान औद्योगीक संस्थांनाही कर्ज पुरवठा केलेला आहे. तसेच जिल्हयातील ग्रामीण कारागीर, दुर्बल घटक, सुशिक्षीत बेरोजगार यांचा आर्थिक विकास व्हावा हा दृष्टीकोन समोर ठेवून कर्ज पुरवठा केलेला आहे.

### उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उद्देश व कार्ये :-

1) उस्मानाबाद जिल्हयातील संलग्न सहकारी संस्थांना वित्त पुरवठा करणे व अधिकोषण व्यवहार करणे.
2) सभासद संस्थांच्या पर्यायाने जिल्हयातील पत पुरवठयात संतूलन निर्माण करणे.
3) ग्रामीण भागात अधिकोषण पध्दतीचा प्रसार करणे.
4) सभासद व बिगर सभासदांकडून ठेवी स्वीकारणे.
5) नागरी बचतीव्दारे गोळा केलेल्या भांडवलाचा कृषी क्षेत्रासाठी उपयोग करणे.
6) प्राथमिक सहकारी पतसंस्थांनी दिलेल्या कर्जाचा उत्पादन कार्यासाठी उपयोग होईल याकडे लक्ष देणे.
7) जिल्हयातील सहकारी चळवळीचा विकास करणे.
8) शेतीमाल, सोने - चांदी, इत्यादी तारणावर कर्ज देणे.
9) कर्जदार असलेल्या संस्थांचे ऋणपरीशोधक म्हणून काम करणे.
10) बँकींगची सर्व प्रकारची कामे करणे.

### उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक खालील संस्थांना कर्ज पुरवठा करते

1) प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (सहकारी सोसायटया)
2) नागरी सहकारी बँक
3) कर्मचारी सहकारी पतसंस्था
4) नागरी व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था
5) सहकारी साखर कारखाने , सहकारी सुतगिरण्या इ. प्रक्रिया संस्था
6) औद्योगिक सहकारी संस्था
7) सहकारी खरेदी विक्री संघ
8) विणकरांच्या सहकारी संस्था
9) इतर प्रकारच्या सहकारी संस्था
10) दुग्ध सहकारी संस्था
11) शेळी - मेंढी सहकारी संस्था
12) जिल्हयातील शेतकरी
13) गृहनिर्माण सहकारी संस्था
14) स्वंय सहायता बचत गट
15) मजूर सहकारी संस्था

### उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा शाखा विस्तार :-

सहकार क्षेत्राचा आपल्या देशातील वाढता विस्तार व प्राथमिक कृषी पतसंस्थांची वाढती संख्या या कारणामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा काढणे गरजेचे आहे. शाखा विस्तारामुळे बँकेतील कर्ज वाटप संबंधी धोरण, बँकेच्या विविध सेवा सुविद्यांचा विस्तार होण्यास मदत होते. सन 1971 पासून अनेक राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा विस्तारकरण्याचा कार्यक्रम सरु करण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्र , गुजरात , उत्तरप्रदेश , कर्नाटक आणि पंजाब या राज्यात शाखा विस्तार करण्यावर जास्त भर देण्यात आला.खालील सारणी वरुन उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा विस्ताराची कल्पना येईल.

सारणी क्र.3.3 वरील माहिती वरुन हे स्पष्ट होते, वर्ष 2000-01 मध्ये उस्मानाबाद जि.म.सह.बँकेच्या एकूण शाखांची संख्या 97 होती. त्यामध्ये वाढ होऊन वर्ष 2009-10 मध्ये बँकेच्या एकूण शाखांची संख्या 100 शाखा व 2 विस्तारीत कक्ष अशी एकूण 102 झालेली आहे. अध्ययन काळात बँकेच्या शाखा विस्तारामध्ये वर्ष 2001-02 मध्ये 1 शाखा वाढ, 2003-04 मध्ये 2 शाखा वाढ व 2006-07 मध्ये 2 शाखा वाढ झालेली दिसून येते. बँकेच्या शाखा विस्तारामध्ये वर्ष 2000-01 ते वर्ष 2009-10 मध्ये वार्षिक सरासरी 0.56% वाढ झालेली दिसून येते.

**सारणी क्र. 3.3**
**उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील शाखा विस्तार**

| अ. क्र. | वर्ष | बँकेच्या शाखा | शाखा मधील प्रत्यक्ष वाढ | वार्षिक वाढ / घट (%) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2000-01 | 97 | - | - |
| 2 | 2001-02 | 98 | 1 | 1.03 |
| 3 | 2002-03 | 98 | 0 | 0 |
| 4 | 2003-04 | 100 | 2 | 2.04 |
| 5 | 2004-05 | 100 | 0 | 0 |
| 6 | 2005-06 | 100 | 0 | 0 |
| 7 | 2006-07 | 102 | 2 | 2.00 |
| 8 | 2007-08 | 102 | 0 | 0 |
| 9 | 2008-09 | 102 | 0 | 0 |
| 10 | 2009-10 | 102 | 0 | 0 |
| वार्षिक वाढ / घट | | | **0.56** | **0.56** |

स्त्रोत :- उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. उस्मानाबाद वार्षिक अहवाल वर्ष 2000-01 ते वर्ष 2009-10

उस्मानाबाद जिल्यातील एकूण 8 तालुक्यापैकी उस्मानाबाद जि.म.सह.बँकेच्या सर्वात जास्त शाखा उस्मानाबाद तालुक्यात एकूण 25 शाखा कार्यरत आहेत. तर सर्वात कमी शाखा वाशी तालुक्यात एकूण 4 शाखा कार्यरत आहेत.

## संदर्भ ग्रन्थ –

1) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा उस्मानाबाद, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, वर्ष 2000-01, पृष्ठ क्र.3.
2) गजेंद्रगडकर भारत, धाराशिव ते उस्मानाबाद, ग्रंथाली ज्ञानयज्ञ, मुंबई, 2002, पृष्ठ क्र.24.
3) बालवाड रमेश, आपला उस्मानाबाद जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, लातूर, 2010, पृष्ठ क्र.8.
4) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा उस्मानाबाद, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2010, पृष्ठ क्र.9-11.
5) प्रा. गायकवाड उमाकांत, उस्मानाबाद जिल्हा विशेष, सनराईज पब्लिकेशन्स, उस्मानाबाद, 2007, पृष्ठ क्र.9-11.
6) शिक्षण अधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, वार्षिक अहवाल 2009-10, पृष्ठ क्र.105-127.
7) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा उस्मानाबाद, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2010, पृष्ठ क्र.17-28.
8) मा. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, उस्मानाबाद, 2010, पृष्ठ क्र.48.